**नि.क्र. १८ वरील आदेशाप्रमाणे विना उलट तपासाचा आदेश रद्द झाल्याने शपथेवरती उलट तपास सुरु.**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचे मार्फत.</u>**

०२. मी अपघाताची माहिती पोलीसांना रुग्णालयामध्ये दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्यावेळी माझ्याकडे माझा मोबाईल होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघाताच्यावेळेस माझ्या मुलाकडे सुध्दा मोबाईल होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यानंतर अपघाताची माहिती पोलीस स्टेशनला देणे ही वाहन चालकाची जबाबदारी आहे. मी व माझ्या मुलाने अपघाताबाबत आचरा पोलीस स्टेशनला फोनवरुन माहिती दिली नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या ठिकाणी मोबाईलला रेंज नव्हती. बुधवळे पासून कणकवली येथे जात असताना मोबाईलला रेंज होती. हे म्हणणे खरे आहे की, आचरा कणकवली रस्त्यावरती मोबाईलला कायम रेंज असते. अपघातस्थळापासून आचरा कणकवली रस्ता हा पाच ते सात किलोमिटर अंतरावरती आहे. माझ्या मुलाचा पाय तुटलेला होता, माझी स्वतःची दोन बोटे तुटलेली होती, त्यामुळे मी पोलीसांना कणकवली येथे जाताना मोबाईलवरुन कळविले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी कणकवली येथे जाताना माझ्यासोबत माझे नातेवाईक होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझा मेव्हूणा होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासोबत असलेल्या नातेवाईकाला पोलीसांना माहिती देण्यासाठी कुठलीही अडचण नव्हती. कणकवली येथे रुग्णालयात गेल्यानंतर पोलीसांना अपघाताची माहिती देण्यासाठी आम्हाला अडचण होती.

०३. मला दिशा समजतात. माझे १० वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बुधवळयाकडून आचऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावरती अपघातस्थळावरील रस्ता उताराचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघातस्थळी उतार नाही हे मी खोटे सांगत आहे. हे

म्हणणे खरे नाही की, अपघातस्थळावरती आचऱ्याकडून बुधवळयाकडे जाणारा रस्ता चढाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरती वळण रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरती अंर्तवक्र रस्ता आहे.

०४. हे म्हणणे खरे नाही की, मी गाडी बेदरकारपणे चालवत होतो. हे म्हणणे खरे नाही की, वळणावरती माझे वाहन वेगाने होते, त्यामुळे मला माझे वाहन नियंत्रीत करता आले नाही व माझे वाहन आरोपीच्या वाहनाच्या आरशाला जावून धडकले होते, त्यामुळे माझे नियंत्रण जावून माझा अपघात झाला होता. मी आरोपीला साधारणपणे ३० ते ३५ फूट अंतरावरुन पाहिले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळावरील रस्त्याला दोन्ही बाजूने साईडपट्टी आहे. हे म्हणणे खरे नाही की, बुधवळ्याकडून आचऱ्याकडे जाताना तेथील रस्त्याला साधारणपणे ९ फूटाची साईडपट्टी आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, साधारणपणे ४ फूटाची साईडपट्टी आहे. हे म्हणणे खरे नाही की, साईडपट्टीच्या लगत मोकळी जागा आहे. हे म्हणणे खरे नाही की, साईडपट्टीच्या लगत मोकळी जागा असतानाही, मी मोकळी जागा नाही हे खोटे सांगत आहे.

०५. मी पोलीसांना जबाब दिलेला आहे. मी पोलीसांना घटनास्थळी जे पाहिले होते त्याबाबत थोडक्यात सांगितले होते. मी पोलीसांना मोटरसायकलचा कुठला भाग कोठे धडकला होता हे सांगितले नव्हते.

प्रश्न – तुम्हाला तुमच्या मोटरसायकलला कुठल्या भागावरती धडक दिली होती ही बाब पोलीसांना सांगण्यासाठी अडचण होती का ?

उत्तर – मी नुकतीच शुध्द आलेली होती.

०६. माझा जबाब नोंदविण्यापुर्वी वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मला तपासले होते. वैद्यकिय अधिकाऱ्यांनी जबाब देण्यासाठी माझी शारिरिक अथवा मानसिक अडचण आहे का याबाबत विचारले होते. मी वैद्यकिय अधिकाऱ्यांना माझी जबाब देण्याची मानसिक स्थिती नाही असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी मानसिक स्थिती चांगली असल्यामुळे वैद्यकिय

अधिकाऱ्यांनी माझा जबाब नोंदविण्यासाठी परवानगी दिली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, पुर्ण मानसिक स्थिती चांगली नव्हती. मला जबाब देण्यासाठी कुठलीही सक्ती केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझी पुर्ण मानसिक स्थिती चांगली नव्हती व पोलीसांना थोडक्यात माहिती दिली होती याबाबी मी खोटया सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्यावेळेस मी स्वतः उपस्थित नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मी रुग्णालयात गेल्यानंतर अपघातस्थळावरती वाहनांची परिस्थिती काय होती हे मला माहिती नाही.

०७. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना हाताशी धरुन चुकीचा पंचनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा सावकाशपणे आचऱ्याकडून बुधवळयाकडे जात असताना मी चुकीच्या दिशेला जावून आरोपीच्या गाडीच्या आरशाला ठोस दिली, त्यामुळे माझी गाडी मला नियंत्रीत झाली नाही आणि त्यामुळे मला अपघातात दुखापती झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चुकीमुळे आरोपीच्या गाडीला ठोस दिल्यामुळे आरोपीच्या वाहनाचे सुध्दा नुकसान झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताची पुर्ण जबाबदारी माझी आहे व मी निरापराध आरोपीला प्रस्तुत प्रकरणामध्ये गुंतवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद देवून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : मालवण
दिनांक : ०३/०३/२०२५

महेश रा. देवकते
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मालवण